


मुंबई : चिंचपोकळीच्या चिंतामणीचे शनिवारी जल्लोषात आगमन होऊन गणरायाची मूर्ती मंडपात स्थानापन्न झाली. या वेळी गणेशभक्तांनी बाप्पाचे जोरदार स्वागत केले. यंदा चिंचपोकळीच्या गणेशोत्सव मंडळाचे १०३वे वर्ष आहे.

रविवार, २८ ऑगस्ट २०२२
◆ वर्ष १५ ◆ अंक ४२
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

अनिल परबांच्या रिसॉर्टवर हातोडा पडणार -सोमय्या/२
आर्थिक क्षेत्राची तसेच पुस्तकांची माहिती देणारी सदरे/४, ८
गणेशभक्तांच्या निर्विघ्न प्रवासासाठी पोलीस सज्ज/७

# महाराष्ट्राचे उदय लळीत देशाच्या सरन्यायाधीशपदी | कोकणच्या शिरपेचात मानाचा तुरा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

न्यायमूर्ती उदय उमेश लळीत भारताचे ४९वे सरन्यायाधीश बनले आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना शनिवारी (दि. २७) सरन्यायाधीशपदाची शपथ दिली. राष्ट्रपती भवनात झालेल्या या सोहळ्यास उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इतर मान्यवर उपस्थित होते. लळीत यांच्या नियुक्तीने कोकणच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

कोणत्याही हायकोर्टाचे न्यायाधीश नसतानाही उदय लळीत हे देशाचे सरन्यायाधीश झाले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या इतिहासातील ही दुसरी घटना आहे. लळीत यांचा कार्यकाळ तीन महिन्यांपेक्षाही कमी असणार आहे. ८ नोव्हेंबर रोजी ते निवृत्त होणार आहेत. या दरम्यान महाराष्ट्रातील सत्तासंघर्षासह इतर महत्त्वांच्या प्रकरणांचा निकाल लागणार का याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

विजयदुर्गजवळ असलेले गिर्ये हे उदय लळीत यांचे मूळ गाव आहे, तर त्यांचा जन्म ९ नोव्हेंबर १९५७ रोजी सोलापूरमध्ये झाला. त्यांच्या घराण्यात वकिली पिढीजात चालत आलेली आहे. सरन्यायाधीशपदाची जबाबदारी स्वीकारणे लळीत हे चौथे मराठी व्यक्ती ठरले आहेत. याआधी पी. बी. गजेंद्रगडकर, यशवंत चंद्रचूड आणि शरद बोबडे यांनी देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे सर्वोच्च स्थान भूषविले होते.



> प्रत्येक प्रकरणाच्या यादीत पारदर्शकता आणण्याचा माझा प्रयत्न असेल तसेच तातडीची प्रकरणे संबंधित खंडपीठांसमोर मुक्तपणे मांडता येतील यासाठी प्रयत्न करणार असून वर्षभर चालेल असे एक घटनापीठ बनवण्याची इच्छा आहे.
> –उदय लळीत, सरन्यायाधीश

# विनाशकाले विपरीत बुद्धी!

### ■ शिवसेना-संभाजी ब्रिगेड युतीवर उपमुख्यमंत्री फडणवीसांची प्रतिक्रिया



**नागपूर : प्रतिनिधी**

शिवसेना आणि संभाजी ब्रिगेडच्या युतीवर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सूचक शब्दांत प्रतिक्रिया दिली आहे. ते नागपुरात पत्रकारांशी बोलत होते.

प्रसारमाध्यमांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शिवसेना आणि संभाजी ब्रिगेड युतीसंदर्भात प्रतिक्रिया विचारली असता ते म्हणाले, मी यावर एवढेच म्हणेन की विनाशकाले विपरीत बुद्धी. या वेळी त्यांनी गुलाम नबी आझाद यांनी काँग्रेसला दिलेली सोडचिठ्ठी आणि शिवसेनेचा दसरा मेळावा या मुद्द्यांवरदेखील भाष्य केले.

'काँग्रेस एक बुडते जहाज आहे. ज्यांना हे वाटते की आता या जहाजाला वाचवता येणार नाही असे लोक वेगळा निर्णय घेत आहेत. मला वाटते गुलाम नबी आझाद यांनी काही वैध मुद्दे उपस्थित केले आहेत, मात्र हा काँग्रेसचा अंतर्गत मुद्दा आहे. त्यावर मी काय बोलणार', असे फडणवीस म्हणाले.

दरम्यान, शिवसेनेकडून शिवाजी पार्कवर दसरा मेळावा घेण्याची तयारी सुरू करण्यात आली आहे. त्यावर बोलताना राज्य सरकार नियमाबाहेरचे काहीही करणार नाही, अशी सूचक प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. एकनाथ शिंदे शिवसेनेचे नेते आहेत. त्यामुळे त्यांच्या पक्षाचा निर्णय काय आहे, ते मेळावा घेणार आहेत की नाही याची मला कल्पना नाही. गृहमंत्री म्हणून एवढेच सांगतो जे नियमात असेल ते आम्ही करू, असेही उपमुख्यमंत्री फडणवीसांनी सांगितले.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्यामुळे सर्वसामान्य नागरिकाला न्याय

### बँकेकडून पैसे मिळाले परत



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्यामुळे एका सर्वसामान्य नागरिकाला न्याय मिळाला असून पंतप्रधान आवास योजनेचे पैसे पुन्हा मिळाले आहेत. त्यामुळे त्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि आमदार प्रशांत ठाकूर यांचे आभार मानले आहेत.

पनवेल तालुक्यातील हरिग्राम येथे सदाशिव झपाटे यांनी जानेवारी २०१८मध्ये मुलाच्या नावावर फ्लॅट विकत घेतला होता. त्यानंतर त्यांना नोव्हेंबर महिन्यात पंतप्रधान आवास योजनेंतर्गत दोन लाख ६७ हजार रुपये मिळाले. त्यांनी हा फ्लॅट विकत घेण्यासाठी इंडिया बुल्स बँकेतून लोन घेतले होते, मात्र व्याज दर जास्त असल्याने त्यांनी बँकेत जाऊन लोन दुसऱ्या बँकेत ट्रान्सफर करण्यास सांगितले, मात्र त्यांचे पंतप्रधान आवास योजनेचे पैसे परत मिळणार नाहीत, असे त्यांना बँकेमार्फत सांगण्यात आले.

आपले हक्काचे पैसे पुन्हा मिळणार नसल्याचे समजताच सदाशिव झपाटे यांनी या संदर्भात बँकेच्या वरिष्ठांकडे तक्रार केली तसेच पत्रव्यवहार केला. अनेक वेळा बँकेत खेटाही मारल्या. तरीही त्यांना न्याय मिळत नव्हता. या संदर्भात त्यांनी हरिग्राम येथील भाजपच्या पदाधिकाऱ्यांमार्फत आपली समस्या आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासमोर मांडली. आमदारांनी याची त्वरित दखल घेत संबंधितांना फोन करून त्यांना सूचना दिल्या. त्यानंतर अवघ्या १५ दिवसांत झपाटे यांचे पैसे मिळाले असून त्यांचे लोनही दुसऱ्या बँकेत ट्रान्सफर झाले. त्याबद्दल त्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट घेऊन आभार मानले. या वेळी हरिग्रामचे पोलीस पाटील सदानंद म्हात्रे, माजी उपसरपंच विश्वास म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य श्रीनिवास म्हात्रे उपस्थित होते.

## महाराष्ट्र शैक्षणिक राजधानी म्हणून उदयास यावे –राज्यपाल कोश्यारी

**सिंधुदुर्ग** : महाराष्ट्र केवळ आर्थिक राजधानी न राहता हे राज्य शैक्षणिक राजधानी म्हणून संपूर्ण देशात उदयास यावे, अशी अपेक्षा राज्यपाल तथा मुंबई विद्यापीठाचे कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी व्यक्त केली. राज्यपालांच्या हस्ते शनिवारी (दि. २७) मुंबई विद्यापीठातंर्गत कणकवली तालुक्यातील तळेरे येथील विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालय इमारतीचे (कॅम्पस) उद्घाटन झाले. त्या वेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास शालेय शिक्षण व मराठी भाषामंत्री दीपक केसरकर, आमदार नितेश राणे आदी उपस्थित होते.

## खंडाळा घाटात बस उलटून २० जण जखमी



**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

लोणावळ्याकडून खोपोलीकडे येणारी एक खासगी प्रवासी बस शनिवारी (दि. २७) दुपारी साडेबाराच्या सुमारास खंडाळा घाटात उलटून २० प्रवासी जखमी झाले आहेत. त्यांना रुग्णालयांत दाखल करण्यात आले आहे.

आयटीमध्ये काम करणारे हैदराबाद येथील ६० तरुण-तरुणी खालापूर तालुक्यातील चौक येथील इर्शाळगड पर्यटनासाठी निघाले होते. हैदराबादहून पुण्यापर्यंत ते रेल्वेने आले व त्यानंतर दोन बसमधून इर्शाळगडकडे येत होते. त्यातील एक बस खंडाळा घाटातील शिंग्रोबा मंदिर परिसरात उलटली. या बसमध्ये एकूण ३० प्रवासी होते. त्यापैकी २० जण या अपघातात जखमी झाले. त्यांच्यावर खोपोली नगरपालिका व अन्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## निवडक

### आज देशभरात होणार जेईई ॲडव्हान्स परीक्षा

**पुणे :** देशातील सर्वोच्च अभियांत्रिकी संस्थांतील प्रवेशासाठी राष्ट्रीय स्तरावर घेतली जाणारी जेईई ॲडव्हान्स परीक्षा रविवारी (दि. २८) आहे. ही संयुक्त प्रवेश परीक्षा दोन सत्रांत होणार असून पहिला पेपर सकाळी ९ वाजता, तर दुसरा पेपर दुपारी २.३० वाजता सुरू होईल.

### मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर तात्पुरती टोलमाफी

**मुंबई** : दुरूस्तीचे काम चालू असल्यामुळे मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर टोल न आकारण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना तात्पुरती टोलमाफी मिळणार आहे. वाहतूक कोंडी फोडण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. ज्या वाहनांकडे गणेशोत्सवासाठी पास किंवा स्टिकर्स आहेत त्या वाहनांना टोल माफ करण्यात येत आहे.

## ना. रवींद्र चव्हाण यांचा आज सत्कार सोहळा

### विविध पक्षांतील कार्यकर्ते करणार भाजपमध्ये प्रवेश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

फडणवीस सरकार असताना रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून जबाबदारीने काम करणारे तसेच आताच्या शिंदे-फडणवीस सरकारमधील राज्याचे सार्वजनिक बांधकाम, अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षणमंत्री रवींद्र चव्हाण यांचा सत्कार समारंभ आणि विविध पक्षांतील कार्यकर्त्यांचा भाजप प्रवेश सोहळा रविवारी (दि. २८) सकाळी १० वाजता उरणमधील जेएनपीटी मल्टीपर्पज हॉलमध्ये होणार आहे.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, खालापूर तालुकाध्यक्ष रामदास ठोंबरे यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांची उपस्थिती असणार आहे. प्रथम राष्ट्र, नंतर संघटन आणि मग स्वतः अशी देशहिताची विचारसरणी असलेल्या भारतीय जनता पक्षात इतर पक्षांतील कार्यकर्त्यांचा ओढा दिवसेंदिवस वाढत आहे. त्याच अनुषंगाने विविध पक्षांतील कार्यकर्ते या वेळी भाजपमध्ये जाहीर प्रवेश करणार आहेत.

# रयत शिक्षण संस्था माझी मातृसंस्था

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे प्रतिपादन

### वाशीत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वितरण

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्था ही माझी मातृसंस्था आहे, असे प्रतिपादन 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले. वाशीतील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये आयोजित विद्यार्थी शिष्यवृत्ती समारंभात ते बोलत होते.

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये विद्यार्थी कल्याण व विद्यार्थी परिषद समितीच्या वतीने राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत संस्थात्मक शिष्यवृत्ती वितरण समारंभ शुक्रवारी (दि. २६) झाला. कॉलेजमध्ये प्रथमच आयोजित हा समारंभ लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झाला.



या समारंभाला कॉलेज विकास समितीचे सदस्य ॲड. पी. सी. पाटील, प्राचार्य डॉ. शुभदा नायक, उपप्राचार्य प्रा. सी. डी. भोसले, डॉ. भारती पाटील, डॉ. राजेश्री घोरपडे, डॉ. प्रतिभा देवणे, डॉ. आबासाहेब सरवदे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.

या समारंभात एनसीसी, एनएसएस युनिटमधील तसेच क्रीडा, संशोधन, शैक्षणिक सामाजिक कार्य क्षेत्रातील आणि सांस्कृतिक विभागातील शंभरहून अधिक गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते शिष्यवृत्ती प्रदान करून गौरविण्यात आले.

यश-अपयश हे आपल्या मानसिकतेवर अवलंबून असते. विश्वास ठेवून एखादे काम केले, तर आपण आयुष्यात नक्कीच यशस्वी होतो, असे सांगून लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शिष्यवृत्ती मिळालेल्या विद्यार्थ्यांने अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

प्राचार्य डॉ. शुभदा नायक यांनी महाविद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीचा आढावा मनोगतातून व्यक्त केला.

## एकपात्री, द्विपात्री अभिनय स्पर्धेची आज पनवेलमध्ये रंगणार अंतिम फेरी

### अभिनेते पृथ्वीक प्रताप, भरत सावले यांची लाभणार उपस्थिती




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा पुरस्कृत भाजप सांस्कृतिक सेल उत्तर रायगडच्या वतीने आयोजित एकपात्री व द्विपात्री अभिनय स्पर्धेची अंतिम फेरी रविवारी (दि. २८) पनवेल येथे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात होणार आहे.

सकाळी ९ वाजता या स्पर्धेचे उद्घाटन आणि बक्षीस वितरण सायंकाळी ५ वाजता होणार आहे. या वेळी प्रमुख अतिथी म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, सुप्रसिद्ध निर्मात्या कल्पना कोठारी, नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष परेश ठाकूर, भाजपचे शहराध्यक्ष जयंत पगडे यांची, तर सन्माननीय अतिथी म्हणून अभिनेते पृथ्वीक प्रताप, भरत सावले यांची उपस्थिती असणार आहे.

आमदार प्रशांत ठाकूर आणि महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली नाट्य परिषद पनवेल शाखा आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने दरवर्षी वेगवेगळ्या नाट्यस्पर्धांचे आयोजन केले जाते. 'रंगमंच आमचा कलाविष्कार तुमचा' असे ब्रीद घेत अटल करंडक एकांकिका स्पर्धा, मायबोली एकपात्री अभिनय स्पर्धा, एकपात्री आणि द्विपात्री अभिनय स्पर्धांचे आयोजन करून कलाकारांच्या आविष्काराला दाद दिली जाते. या स्पर्धा राज्यस्तरीय पातळीवर होतात.

एकपात्री व द्विपात्री अभिनय स्पर्धेचे यंदाचे हे तिसरे वर्ष असून नाट्यरसिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज भारत-पाकिस्तान लढत

**दुबई : वृत्तसंस्था**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेला सुरुवात झाली असून भारत आणि पाकिस्तान या कट्टर पारंपरिक प्रतिस्पर्धी संघांमध्ये रविवारी (दि. २८) सामना खेळला जाणार आहे. या सामन्यात काय होणार याची तमाम क्रिकेटप्रेमींना उत्सुकता लागून राहिली आहे.

यंदाच्या आशिया चषकासाठी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) १५ सदस्यीय संघाची निवड केली आहे. निवडलेल्या संघाचे नेतृत्व रोहित शर्माकडे, तर केएल राहुलकडे उपकर्णधारपद सोपविण्यात आले आहे. माजी कर्णधार विराट कोहलीसुद्धा संघाचा भाग असणार आहे. याशिवाय हार्दिक पांड्या, रवींद्र जडेजा या अष्टपैलू खेळाडूंसह रविचंद्रन अश्विन, युझवेंद्र चहल, रवी बिश्नोई, भुवनेश्वर कुमार, अर्शदीप सिंग, आवेश खान, ऋषभ पंत आणि दिनेश कार्तिक या क्रिकेटपटूंना संघात स्थान देण्यात आले आहे.

दुसरीकडे वेगवान गोलंदाज शाहीन आफ्रिदी दुखापतीमुळे आशिया चषक स्पर्धेतून बाहेर पडल्यानंतर पाकिस्तानला आणखी एक झटका बसला आहे. वेगवान गोलंदाज मोहम्मद वसीमही दुखापतीमुळे स्पर्धेबाहेर झाला आहे.



RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक १०९(७)] शुक्रवार, ऑगस्ट १२, २०२२/श्रावण २१, शके १९४४ [पृष्ठे १६, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३०४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,

मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ ऑगस्ट २०२२

**अधिसूचना**

**महाराष्ट्र महामार्ग अधिनियम.**

क्रमांक खाक्षेस-२०२०/प्र.क्र.४१७(पेण)/रस्ते-८.— ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित हे महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) याच्या कलम ४ च्या परंतुकाच्या तरतुदीं अनुसार (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) विरार अलिबाग बहुउद्देशीय मार्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राज्य महामार्ग (विशेष) क्र. ४ यासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त महामार्ग" असा करण्यात आला आहे) महामार्ग प्राधिकरण आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित महामार्ग प्राधिकरणाने उक्त महामार्गाच्या संदर्भात महामार्ग प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र शासनाला विनंती केली आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूचीत उल्लेखित जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे) उक्त महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यांसाठी आवश्यक एक सार्वजनिक प्रयोजन म्हणून उक्त अधिनियमाच्या तरतुदीं अंतर्गत उक्त महामार्ग प्राधिकरणासाठी, महाराष्ट्र शासनाकडून अधिग्रहित करण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची खात्री पटली आहे की, एका सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन ही उक्त महामार्गाचे किंवा त्याच्या काही भागाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यासाठी आवश्यक आहे आणि म्हणून उक्त महामार्ग प्राधिकरणासाठी, पूर्वोक्त प्रयोजनांकरिता, उक्त जमीन संपादित करणे शासनास इष्ट वाटते ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम १९५५ (१९५५ चा ५५) याच्या कलम १५ च्या पोट- कलम (२) व (३) व कलम १७ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे,—

(एक) उक्त महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन करणे यांसाठी उक्त महामार्ग प्राधिकरणासाठी उक्त जमिनीचे संपादन करण्याची घोषणा करीत आहे ;

(दोन) विनिर्दिष्ट करीत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ७ अंतर्गत निर्गमित केलेल्या अधिसूचनेला प्रतिसाद म्हणून ज्यांच्या हरकती व सूचना यापूर्वीच विचारात घेतल्या आहेत किंवा महामार्ग प्राधिकरणाकडून सुनावणी झाली आहे अशा व्यक्तींखेरीज उक्त जमिनीशी हितसंबंधित कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून एकवीस दिवसांच्या आत संबंधित भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, पेण यांच्याकडे उक्त महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यासाठीच्या प्रयोजनांसाठी उक्त जमिनीच्या वापराबाबत लेखी व त्याच्या कारणांसह आक्षेप घेऊ शकते.

**अनुसूची**

**संपादित करावयासाठी उद्देशित असलेल्या जमिनीचे वर्णन**

तालुका पेण, जिल्हा रायगड

| अ.क्र. | गावचे नाव | गट क्र. / सर्व्हे क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | हेक्टर | आर |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | आंबिवली | १८ | - | ० | ०९.०० |
| २ | आंबिवली | ४१ | - | ० | ०४.०० |
| ३ | आंबिवली | ४४ | - | ० | ०२.०० |
| ४ | आंबिवली | ४५ | - | ० | २३.०० |
| ५ | आंबिवली | ४६ | - | ० | ०१.०० |
| ६ | आंबिवली | ४७ | - | ० | ३३.०० |
| ७ | आंबिवली | ५३ | - | ० | २६.०० |
| ८ | आंबिवली | ५४ | - | ० | ३३.०० |
| ९ | आंबिवली | ५५ | - | ० | ३२.०० |
| १० | आंबिवली | ५८ | - | ० | ०३.०० |
| ११ | आंबिवली | ५९ | - | १ | १४.०० |
| १२ | आंबिवली | ६० | - | ० | ०२.०० |
| १३ | आंबिवली | ६२ | - | ० | १४.०० |
| १४ | आंबिवली | ६१ | - | ० | ०३.०० |
| १५ | आंबिवली | ६६ | - | ० | ०१.०० |
| १६ | आंबिवली | ५२ | - | ० | ०५.०० |
| १७ | आंबिवली | ५१ | - | ० | ०६.०० |
| १८ | आंबिवली | ५० | - | ० | ०६.०० |
| १९ | आंबिवली | ४९ | - | ० | १९.०० |
| २० | आंबिवली | ८० | - | ० | ०८.०० |
| २१ | आंबिवली | ७९ | १ | ० | ०९.०० |
| २२ | आंबिवली | ७९ | २ | ० | ७६.०० |
| २३ | आंबिवली | ७७ | - | ० | १९.०० |
| २४ | आंबिवली | ८६ | - | ० | ०८.०० |
| २५ | आंबिवली | ७३ | - | ० | २६.०० |
| २६ | आंबिवली | ७१ | - | ० | १६.०० |
| २७ | आंबिवली | ७२ | - | ० | ०८.०० |
| २८ | आंबिवली | ८७ | - | ० | ३४.०० |
| २९ | आंबिवली | ८८ | - | ० | १९.०० |
| ३० | आंबिवली | ८५ | - | ० | ३४.०० |
| ३१ | आंबिवली | ८९ | - | ० | ७३.०० |
| ३२ | आंबिवली | ९० | - | ० | ८४.०० |
| ३३ | आंबिवली | ७९ | ३ | ० | ५४.०० |
| ३४ | आंबिवली | ९१ | - | ० | ३६.०० |
| ३५ | आंबिवली | ९४ | - | ० | ०२.०० |
| ३६ | आंबिवली | ८३ | - | ० | ९९.०० |
| ३७ | आंबिवली | ९६ | - | ० | ०७.०० |
| ३८ | आंबिवली | ३४ | - | १ | ०२.०० |
| ३९ | आंबिवली | ३५ | अ | ० | ६४.०० |
| ४० | आंबिवली | ३५ | ब | ० | ३६.०० |
| ४१ | आंबिवली | २१ | - | ० | ०३.०० |
| ४२ | आंबिवली | २० | - | ० | २९.०० |
| ४३ | आंबिवली | २२ | - | २ | ३२.०० |
| ४४ | आंबिवली | १०० | - | ० | २३.०० |
| ४५ | आंबिवली | १०५ | - | ० | ०३.०० |
| ४६ | आंबिवली | १२७ | - | ० | ०२.०० |
| ४७ | आंबिवली | २३ | - | ० | ५५.०० |
| ४८ | आंबिवली | ३२ | - | ० | ०६.०० |
| ४९ | आंबिवली | २४ | - | ० | ४७.०० |
| ५० | आंबिवली | १४ | - | ० | १९.०० |
| ५१ | आंबिवली | १३ | - | ० | ०२.०० |
| ५२ | आंबिवली | ८२ | - | ० | २४.०० |
| ५३ | आंबिवली | ३७ | - | ० | ०६.०० |
| ५४ | आंबिवली | ११ | - | ० | ४८.०० |
| ५५ | बळवली | ९५ | - | ० | ०३.०० |
| ५६ | बळवली | ९६ | - | ० | ०४.०० |
| ५७ | बळवली | ९७ | - | ० | १७.०० |
| ५८ | बळवली | ९८ | - | ० | १७.०० |
| ५९ | बळवली | २ | - | ० | १२.०० |
| ६० | बळवली | १ | - | ० | २७.०० |
| ६१ | बळवली | १४ | - | ० | ११.०० |
| ६२ | बळवली | १३ | - | ० | ४७.०० |
| ६३ | बळवली | १७ | - | ० | ०२.०० |
| ६४ | बळवली | २२ | - | ० | १२.०० |
| ६५ | बळवली | २१ | - | ० | ३६.०० |
| ६६ | बळवली | ३९ | - | ० | ३१.०० |
| ६७ | बळवली | ३८ | - | ० | २.०० |
| ६८ | बळवली | ३७ | - | ० | २०.०० |
| ६९ | बळवली | ३६ | - | ० | ०१.०० |
| ७० | बळवली | ४२ | - | ० | १५.०० |
| ७१ | बळवली | ४१ | - | ० | ०२.०० |
| ७२ | बळवली | ४४ | - | ० | १८.०० |
| ७३ | बळवली | ४३ | - | ० | ०२.०० |
| ७४ | बळवली | १० पै. | - | ० | ०१.०० |
| ७५ | बळवली | ११ | - | ० | ०३.०० |
| ७६ | बळवली | १२ | - | ० | १६.०० |
| ७७ | बळवली | ७ | - | ० | ३६.०० |
| ७८ | बळवली | ३ | - | ० | ०२.०० |
| ७९ | बळवली | ५ | - | ० | ०९.०० |
| ८० | बळवली | ४ | - | ० | ७०.०० |
| ८१ | बळवली | ६ | - | ० | ९७.०० |
| ८२ | बळवली | ८ | - | ० | ०७.०० |
| ८३ | बळवली | १०२ | - | ० | ४३.०० |
| ८४ | बळवली | २६ | - | ० | ०१.०० |
| ८५ | बळवली | २७ | - | ० | १४.०० |
| ८६ | बळवली | १०५ | - | ० | २६.०० |
| ८७ | बळवली | १०६ | - | ० | १२.०० |

पुढील मजकूर पान ५ वर

# कंपन्यांच्या विक्रीतील ‘ही’ वाढ अर्थव्यवस्थेसाठी ‘बूस्टर’ का आहे?

***युद्ध आणि कोरोना संकटामुळे सर्व जग आर्थिक संकटांचा सामना करताना भारत त्याला अपवाद राहू शकत नाही. पण याच विशिष्ट परिस्थितीचा भारताला अनेक आघाड्यांवर लाभही होतो आहे. त्याची प्रचीती खासगी कंपन्यांच्या विक्री आणि नफ्याच्या आकड्यात आली आहे. रिझर्व बँकेचा ताजा अहवाल त्याला दुजोरा देतो आहे.***

मुंबईत एका कार्यक्रमात बोलताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी यावर्षी आणि पुढील वर्षीही भारताचा विकासदर ७.४ टक्के राहील, असा विश्वास व्यक्त केला आहे. जगातील युद्धाच्या स्थितीला विराम मिळाला आणि इंधनाचे दर काबूत राहिले तर भारताला कोणी रोखू शकणार नाही, असे त्यांनी म्हटले आहे. जगाची अर्थव्यवस्था संकटात सापडली आहे, असे म्हटले जात असताना भारताच्या अर्थमंत्र्यांना हा आत्मविश्वास कोठून आला? अर्थात, हा विश्वास केवळ अर्थमंत्र्यांचा नसून आंतरराष्ट्रीय नाणेनिधीही भारताच्या आर्थिक विकासाविषयी आशावादी असल्याचे पाहायला मिळते आहे. याची अर्थातच अनेक कारणे आहेत. त्यातील प्रमुख कारण म्हणजे कोरोनानंतर भारतीय अर्थव्यवस्थेने घेतलेली झेप होय.

अर्थव्यवस्था सुधारते आहे, असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा देशातील कंपन्यांमधील उत्पादनात वृद्धी होते आहे का आणि त्याची विक्री होते आहे काय, हे अतिशय महत्वाचे ठरते. त्या आघाडीवर देशात सध्या काय चित्र दिसते आहे, याचा उलगडा रिझर्व बँकेच्या ताज्या अहवालाने केला आहे. शेअर बाजारात नोंद असलेल्या कंपन्यांशी संबधित असाच तो अहवाल असला तरी शितावरून भाताची परीक्षा म्हणून त्याकडे निश्चितच पाहता येईल.भारतीय अर्थव्यवस्था कशी वेगाने संघटीत होते आहे, याचाही अंदाज त्यावरून आल्याशिवाय रहात नाही.

रिझर्व बँकेने २५ ऑगस्टला जाहीर केलेल्या या आकडेवारीची काही प्रमुख वैशिष्टे अशी– १. चालू आर्थिक वर्षाच्या जूनअखेर संपलेल्या पहिल्या तिमाहीत खासगी कंपन्यांची(नॉन फायनान्स) विक्री तब्बल ४१ टक्क्यांनी वाढली आहे. त्याचे एकूण मूल्य १४.११ लाख कोटी रुपये एवढे होते. २. गेल्या आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत (जानेवारी ते मार्च २०२१–२२) ही वाढ २२.३ टक्के होती तर गेल्या वर्षी एप्रिल ते जूनच्या तिमाहीत ती ६०.६ टक्के होती. मात्र ही वाढ कोरोना संकटाच्या पार्श्वभूमीवरील होती. ३. जून २०२२ अखेर दोन हजार ७४९ कंपन्यानी आपले आर्थिक ताळेबंद जाहीर केले असून त्या आधारे ही वाढ काढण्यात आली आहे. यात सरकारी कंपन्या आणि आर्थिक कंपन्यांचा समावेश करण्यात आलेला नाही. वास्तविक या काळात काही सरकारी कंपन्यांही अतिशय चांगले ताळेबंद सादर केले आहेत. ४. उत्पादन क्षेत्रातील कंपन्यांच्या विक्रीतील ही वाढ असल्याने तिला अधिक महत्व आहे. कारण देशात अनेक वस्तूंना मागणी वाढल्याचे त्यातून सिद्ध होते. याकाळात भारताच्या निर्यातीत चांगली वाढ नोंदविली गेली आहे. हेही त्याच्याशी सुसंगतच आहे. ५. माहिती तंत्रज्ञान(आयटी) क्षेत्रातील कंपन्या या भारताच्या दृष्टीने अतिशय महत्वाच्या ठरत आहेत. कोरोनाच्या काळातही त्यांचे कामकाज सुरूच होते. त्यामुळे कोरोनाचा परिणाम त्यांना कमी जाणवला. एप्रिल ते जून २०२२ या तिमाहीत त्यांची विक्री २१.३ टक्क्यांनी झाली आहे. ६. आयटी शिवायच्या ज्या कंपन्या आहेत, त्यांची विक्री गेल्या वर्षाच्या तुलनेत याकाळात ६२.१ टक्क्यांनी वाढली आहे. ७. हॉटेल, रेस्टॉरंट, वाहतूक, व्यापार आणि रियल इस्टेट या क्षेत्राच्या विक्रीने तर या काळात कोरोनापूर्व पातळी गाठली आहे.

भारतीय अर्थव्यवस्था योग्य मार्गाने चालली आहे, असे चित्र यातून समोर येते, मात्र सर्वच नागरिकांना तसे वाटत नाही. त्याचे कारण मात्र विचार करण्यासारखे आहे. आर्थिक व्यवहार वेगाने संघटीत होत आहेत. याचा अर्थ ज्या मोठ्या कंपन्या आहेत, त्यांचा कारभार वाढत चालला असून त्याचा फायदा ठराविक घटकांना होतो. ज्यांना हा फायदा होतो, ते अर्थव्यवस्था योग्य मार्गाने चालली आहे, असे म्हणतात. पण जे छोट्या उद्योग व्यवसायाशी संबधित असतात, त्यांच्या समोरील प्रश्न गुंतागुंतीचे असतात. त्यांना पुरेसे भांडवल मिळत नाही. शिवाय उत्पादन आणि विक्रीसाठी जे पर्याय मोठ्या कंपन्यांना उपलब्ध असतात, ते छोट्या उद्योगांना असत नाहीत. कोणतीही अर्थव्यवस्था संघटीत होत असतानाची ही एक प्रकारे अपरिहार्यता आहे. या प्रक्रियेत असंघटीत समूह मागे रहातात. त्यांना संघटीत व्यवस्थेत कसे सहभागी करून घ्यायचे, ही सरकारची जबाबदारी असते. लोकशाही पद्धतीने निवडून आलेल्या कोणत्याही सरकारला त्याकडे दुर्लक्ष करणे परवडणारे नसते. त्यामुळे हा मुद्दा बाजूला ठेवून आजच्या भारतीय अर्थव्यवस्थेकडे पाहिल्यास तिच्या वाढीचा वेग वाढला आहे, हे मान्य करावे लागते.

अर्थ प्रहर




यमाजी मालकर
(ymalkar@gmail.com)

करवसुलीच्या माध्यमातून सरकारच्या तिजोरीत पडणारी भर, भारताची वाढत असलेली निर्यात, या काळात बँकांचा वाढलेला पतपुरवठा, भारताकडे असलेला परकीय चलनाचा पुरेसा साठा, देशभर सुरु असलेली भांडवली कामे, शेअर बाजारात पुन्हा आलेले परकीय गुंतवणूकदार ही आपली अर्थव्यवस्था चांगल्या स्थितीत असल्याची लक्षणे आहेत. देशभर झालेला चांगला पाऊस, इंधनाचे कमी होत असलेले दर किंवा रशियाकडून इंधन घेतल्यामुळे देशाच्या परकीय चलनाची झालेली बचत आणि चीनविषयीचा जगभर वाढत चाललेला अविश्वास, याचा फायदा देशाच्या अर्थ व्यवस्थेला मिळतो आहे. अशा आव्हानात्मक काळात देशाच्या अर्थव्यवस्थेला जी संधी मिळाली आहे, ती आपण देशवासीय म्हणून कशी घेतो, यावरच आपला पुढील प्रवास अवलंबून आहे.




***मागील लेखातील डाऊ थिअरीनंतर आजच्या लेखात आपण एलियट वेव्ह थिअरीबद्दल जाणून घेणार आहोत. हा असा अजून एक सिद्धांत आहे ज्याला ’आधुनिक’ म्हटलं जातंय. अमेरिकन अकाउंट आणि लेखक राल्फ नेल्सन एलियट यांनी हा सिद्धांत मांडला.***

# सामूहिक मानवी वर्तनांचा अभ्यास करणारा सिद्धांत




इलियटचा जन्म मेरीसविले, कॅन्सस इथं झाला आणि नंतर ते सॅन अँटोनियो, टेक्सास इथं गेले. १८९० च्या मध्यात त्यांनी लेखा क्षेत्रात प्रवेश केला आणि प्रामुख्याने मध्य अमेरिका आणि मेक्सिकोमधील रेल्वेमार्ग कंपन्यांसाठी कार्यकारी पदांवर काम केलं. काही काळानंतर, त्यांनी मध्य अमेरिकेतील सामाजिक आणि आर्थिक समस्यांबद्दल दोन पुस्तकं लिहिली. टी रूम आणि कॅफेटेरिया मॅनेजमेंट आणि दी फ्युचर ऑफ लॅटिन अमेरिका. दुर्दैवानं, मध्य अमेरिकेत काम करत असताना, त्यांना आतड्यांसंबंधीचा आजार झाला ज्यामुळं त्यांना सेवानिवृत्ती घेण्यास भाग पडलं, जी गोष्ट पुढं तांत्रिकी विश्लेषण समुदायाच्या अप्रत्यक्षपणे पथ्यावर पडली. लागलीच त्यांनी अमेरिकेच्या शेअर बाजाराच्या वर्तनाचा अभ्यास करण्यासाठी स्वतःला समर्पित करण्याचा निर्णय घेतला.

अमेरिकी शेअर बाजाराच्या निर्देशांकाचा ७५ वर्षांच्या आकडेवारीचा (वार्षिक, मासिक, साप्ताहिक, दैनिक, तासांगणिक आणि अगदी अर्ध्या तासाच्या आलेखासह) अभ्यास केल्यानंतर त्यांना वेव्ह प्रिन्सिपल, व्यापारी मानसशास्त्राच्या चक्रीय स्वरूपाचं वर्णन आणि तांत्रिक विश्लेषणाचा एक प्रकार विकसित करण्यास प्रवृत्त केलं.

१९२९–१९३२दरम्यान अमेरिकन प्रमुख निर्देशांक डाऊ जोन्स अॅव्हरेज त्याच्या उच्चांकापासून ८९% कोसळला होता आणि या द ग्रेट डिप्रेशनच्या आठवणी त्यांच्या मनात ताज्या झाल्यामुळं सर्व आर्थिक सल्लागार नकारात्मक होते. १३ मार्च १९३५च्या बुधवारी अमेरिकी शेअर बाजार बंद झाल्यानंतर डाऊ जोन्स अॅव्हरेज दिवसभराच्या नीचांकाच्या जवळ बंद झाली होती. एलियट यांनी आपल्या वेव्ह थिअरी विश्लेषणाचा हवाला देत कॉलिन्सला एक टेलिग्राम पाठवला आणि स्पष्टपणे सांगितले की, "NOTWITHSTANDING BEARISH (DOW) IMPLICATIONS ALL AVERAGES ARE MAKING FINAL BOTTOM" (डाऊ जोन्स मंदीमध्ये असूनदेखील सर्व सरासरी (निर्देशांक) अंतिम तळ बनवत आहेत.

दुसऱ्याच दिवशी, १४ मार्च १९३५ रोजीचा बंद भाव हा डाऊ इंडस्ट्रीअल्स साठी त्या वर्षातील नीचांकी होता. १३ महिन्यांचे किंमत–सुधार (करेक्शन) संपलं आणि बाजार लगेचच वरच्या दिशेनं वळला. दोन महिन्यांनंतर, बाजारानं वरच्या दिशेनं वाटचाल सुरू ठेवल्यानं कॉलिन्स यांनी वेव्ह थिअरीवरील पुस्तकासाठी सहयोग करण्यास सहमती दर्शविली. वेव्ह प्रिन्सिपल ३१ ऑगस्ट १९३८ रोजी प्रकाशित झालं. त्यात, त्यांनी असा सल्ला दिला की, जरी स्टॉक मार्केट ट्रेंड यादृच्छिक (random) आणि अंदाज न लावण्याजोगे (unpredictable) भासत असले तरी ते अंदाजयोग्य, नैसर्गिक नियमांचे पालन करणारे आणि फिबोनाची संख्या वापरून मोजले आणि त्याचे अंदाज केले जाऊ शकतात.

१९४०च्या सुरुवातीच्या काळात, ही वेव्ह थिअरी विकसित होत राहिली. एलियट यांनी सामूहिक मानवी वर्तनाचे नमुने फिबोनाची किंवा गोल्डन रेशोशी जोडले, ही एक गणितीय घटना आहे जी हजारो वर्षांपासून निसर्गाच्या स्वरूप आणि प्रगतीच्या सर्वव्यापी नियमांपैकी एक म्हणून ओळखली जाते. या व्हॉल्यूममध्ये त्याच्या वेव्ह थिअरीबद्दलच्या जवळजवळ प्रत्येक विचारांचा समावेश आहे. या एलियटच्या अग्रगण्य संशोधनाचा परिणाम म्हणून, आज हजारो संस्थात्मक पोर्टफोलिओ व्यवस्थापक, व्यापारी आणि खासगी गुंतवणूकदार त्यांच्या गुंतवणुकीच्या निर्णयामध्ये वेव्ह थिअरीचा वापर करतात. द वेव्ह प्रिन्सिपलच्या प्रकाशनाच्या एका वर्षाच्या आत, एलियटना फायनान्शियल वर्ल्ड मॅगझिनसाठी मार्केट ट्रेंडचे विश्लेषण करण्याच्या त्याच्या नवीन प्रणालीचे वर्णन करण्यासाठी १२ लेख लिहिण्यास सांगण्यात आलं. एका दशकानंतर त्यांनी सर्व सामूहिक मानवी वर्तनांना लागू करण्यासाठी त्यांच्या सिद्धांताचा विस्तार केला. नेचर्स लॉ–द सीक्रेट ऑफ द युनिव्हर्स हे महत्वाकांक्षी पुस्तक लिहिलं जे त्यांच्या मृत्यूच्या दोन वर्षांपूर्वी जून १९४६ मध्ये प्रकाशित झालं.




प्रसाद ल. भावे
sharpadvisers@gmail.com

या सिद्धांतांमुळं वित्तीय बाजारातील कल आणि त्यामधील उलथापालथ ओळखण्यास सहाय्य्य होऊ लागलं. बाजारातील विविध मालमत्ता प्रकारांच्या किंमतीच्या हालचालींमधील हे चक्रीय नमुने, या पद्धतीच्या अभ्यासकांमध्ये एलियट वेव्ह म्हणून ओळखले जातात. असा महत्वाचा अभ्यास करण्याआधी ज्या आधारांवर ही थिअरी आधारित आहे, त्या फिबोनाची आकडे किंवा फिबोनाची गुणोत्तरांबद्दल थोडं समजून घेऊ. वर उल्लेखलेला गोल्डन रेश्यो हा त्यातीलच एक भाग. फिबोनाची क्रम इटालियन गणितज्ञ लिओनार्डो फिबोनाची यांनी १३ व्या शतकात विकसित केला होता. शून्य व एकने सुरू होणारी, ही एक सतत वाढत जाणारी मालिका आहे जिथे प्रत्येक संख्या मागील दोन संख्यांच्या बेरजेइतकी असते. उदा. ०+१=१ मग १+१=२ त्यानंतर २ च्या आधीची संख्या १ म्हणून २+१=३, नंतर ३+२=५, ५+३=८, ८+५ =१३ + १३+८ = २१, २१+१३= ३४ आणि पुढं. गणितामध्ये, फिबोनाची संख्या, सामान्यत: Fn२ दर्शविल्या जातात, एक क्रम तयार करतात ज्यास फिबोनाची क्रम किंवा सूत्र संबोधलं जातं. फिबोनाची क्रमातील संख्या एका विशिष्ट सूत्राशी समतुल्य नसल्या तरी, या संख्यांचा एकमेकांशी विशिष्ट संबंध असतो. सुवर्ण गुणोत्तर (गोल्डन रेश्यो):फिबोनाची मालिकेच्या प्रत्येक संख्येला त्याच्या आधीच्या संख्येनं विभाजित करून सुवर्ण गुणोत्तर प्राप्त केलं जातं. उदा. ३४/२१ = १.६१९ ही संख्या जसजशी मोठी होत जाते, तसतसे फिबोनाची संख्यांच्या प्रत्येक सलग जोडीमधील भागांक अंदाजे १.६१८ किंवा त्याचा व्यस्त म्हणजे ०.६१८ असतो. हे प्रमाण अनेक नावांनी ओळखलं जातं जाते. सोनेरी गुणोत्तर, सोनेरी सरासरी, ग्रीक वर्ण द्ध आणि इतरांमध्ये दैवी प्रमाण.

निसर्गातील बऱ्याच गोष्टींमध्ये मितीय गुणधर्म असतात जे १.६१८ या गुणोत्तराचे पालन करतात, त्यामुळे निसर्गाच्या निर्मितीमध्ये देखील याचं मूलभूत कार्य असल्याचे आढळतं.

शतकानुशतके पूर्वी, अलौकिक बुद्धिमान लोकांनी आपल्या सभोवतालच्या सुंदर निसर्गाचे नमुने पाहण्यास सुरुवात केली आणि वनस्पतींमध्ये पानांच्या मांडणीपासून, फुलांच्या पाकळ्यांच्या नमुन्यापर्यंत, शंखाची रचनेपासून ते अननसाच्या खवल्यापर्यंत प्रत्येक गोष्टीचा नमुना समान होता. आणि ही रचना १, २, ३, ५, ८, १३, २१, ३४, ५५.. यांच्या गुणोत्तरातच राहते. १.६१८ हे एक अद्वितीय गुणोत्तर आहे ज्याचा वापर निसर्गाच्या सर्वात लहान गोष्टीपासून, अणूंच्या रचनेपासून अकल्पनीय मोठ्या खगोलीय विवरांसारख्या विश्वातील सर्वात प्रगत नमुन्यांपर्यंत सर्व गोष्टींचे प्रमाण वर्णन करण्यासाठी केला जाऊ शकतो. समतोल राखण्यासाठी निसर्ग या जन्मजात प्रमाणावर अवलंबून असतो. याच गुणोत्तरावरून फिबोनाची स्पायरल हा प्रकार विकसित झाला. जेव्हा तुम्ही एका रेषेला दोन भागांमध्ये विभाजित करता तेव्हा तुम्हाला सुवर्ण गुणोत्तर आढळू शकतं आणि मोठा भाग (र) लहान भाग (ल) ने भागलेला (र) + (ल) (र) ने भागलेल्या बेरजेइतका असतो, जे दोन्हीची बेरीज १.६१८ येते. आकार, लोगो, मांडणी आणि बरेच काही तयार करताना हे सूत्र तुम्हाला मदत करू शकते. सुवर्ण गुणोत्तराची अजूनही अनेक उदाहरणं देता येतील, उदा. बिया, फुलांच्या पाकळ्यांची रचना, मधमाश्यांच्या पोळ्याची रचना, पाईनकोन्स, झाडांच्या फांद्या, शंखाची रचना, आकाशगंगांची रचना, चक्रीवादळाची रचना, चेहऱ्याची ठेवणं, डोळ्याची–कानांची रचना, इ. असं हे सुवर्ण गुणोत्तर नंतर वास्तुकला, चित्रे, शिल्पकला, छायाचित्रण, डिझाइन इत्यादीसाठी प्रमाण तयार करण्यासाठी वापरली गेली. आणि विशेष म्हणजे आर्थिक बाजार देखील या सुवर्ण गुणोत्तर नुसार आहे असंच सिद्ध झालंय. त्याबद्दल पुढील लेखात...




## अर्थसाक्षर स्पर्धा : ३३

### निकाल पुढीलप्रमाणे

**प्रश्न क्र. १. टाटा उद्योग समूहातील सर्वात मोठ्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपनीचे नाव काय आहे?**
***आ.*** टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस)

**प्रश्न क्र. २. पुढीलपैकी कोणती एक बँक सार्वजनिक क्षेत्रातील म्हणजे सरकारी आहे?**
***ई.*** इंडिया ओव्हरसीज बँक

**प्रश्न क्र. ३. शेअर बाजाराच्या निफ्टी इंडेक्समध्ये किती कंपन्यांचा समावेश आहे?**
***इ.*** ५०

**अर्थसाक्षर स्पर्धा ३३च्या प्रश्नांना एकाही स्पर्धकाने बरोबर उत्तर दिलेले नाही. त्यामुळे अर्थसाक्षर स्पर्धा ३३साठी एकही विजेता नाही.**

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ३४

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत ‘राम प्रहर’च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. पुढीलपैकी कोणती संस्था शेअर बाजाराशी संबंधित नाही?**
***अ.*** सेबी(सेक्युरिटीज अॅड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया)
***आ.*** सीडीएसएल(सेन्ट्रलडीपॉझिटरी सर्विसेस इंडिया लिमिटेड)
***इ.*** आयइएक्स (इंडिया एनर्जी एक्सचेंज) ***ई.*** बीएसई (बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज)

**२. भारतात सध्या एलआयसीसह एकूण किती जीवन विमा कंपन्या आहेत?**
***अ.*** २४ ***आ.*** २०
***इ.*** १० ***ई.*** २६

**३. मेटल (धातू) क्षेत्रातील भारतातील सर्वाधिक बाजारमूल्य असणारी कंपनी कोणती?**
***अ.*** टाटा स्टील ***आ.*** जेएसडब्लू स्टील
***इ.*** हिंदाल्को ***ई.*** वेदांता




**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील ‘ई–स्टोर इंडिया’तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

पान ३ वरून

| अ.क्र. | गावचे नाव | गट क्र. / सर्व्हे क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | हेक्टर | आर |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| ८८ | बळवली | १०४ (टाटालाईन) | - | ० | १०.०० |
| ८९ | बळवली | १०५ (टाटालाईन) | - | ० | १२.०० |
| ९० | बळवली | १०६ (टाटालाईन) | | ० | ०६.०० |
| ९१ | बळवली | ३१ | - | ० | ०८.०० |
| ९२ | बळवली | १०४ | - | ० | ०६.०० |
| ९३ | बळवली | १०३ | - | ० | ०२.०० |
| ९४ | बळवली | २९ | - | ० | ११.०० |
| ९५ | बळवली | ३२ | - | ० | ०१.०० |
| ९६ | गोविर्ले | ७ | - | १ | ३३.०० |
| ९७ | गोविर्ले | ५ | - | ० | २३.०० |
| ९८ | गोविर्ले | ४ | - | ० | ०९.०० |
| ९९ | गोविर्ले | ३ | - | ० | ०२.०० |
| १०० | गोविर्ले | २ | - | १ | ४९.०० |
| १०१ | जिते | ७४ | - | ० | ०३.०० |
| १०२ | जिते | ७३ | २ पै. | ० | ०१.०० |
| १०३ | जिते | ७३ | १४ | ० | ०१.०० |
| १०४ | जिते | ७३ | १९ | ० | ०१.०० |
| १०५ | जिते | ७२ | २ | ० | ४०.०० |
| १०६ | जिते | ७२ | ४ | ० | १४.०० |
| १०७ | जिते | ७२ | ६ | ० | ०१.०० |
| १०८ | जिते | ७२ | १ | ० | ११.०० |
| १०९ | जिते | ७२ | १२ | ० | ०१.०० |
| ११० | जिते | ७२ | १३ | ० | ०१.०० |
| १११ | जिते | ६९ | १ | ० | ०३.०० |
| ११२ | जिते | ६९ | ६ | ० | ०१.०० |
| ११३ | जिते | ६९ | ७ | ० | ०२.०० |
| ११४ | जिते | ७१ | १ | ० | ०५.०० |
| ११५ | जिते | ७१ | २ | ० | ०६.०० |
| ११६ | जिते | ७१ | ४ | ० | २७.०० |
| ११७ | जिते | ७१ | ५ | ० | ०१.०० |
| ११८ | हमरापुर | ७८ | १ | ४ | २१.०० |
| ११९ | हमरापुर | ७८ | २ | ० | २१.०० |
| १२० | हमरापुर | ७७ | ३ | १ | ००.०० |
| १२१ | हमरापुर | ११५ | १ | ० | १५.०० |
| १२२ | हमरापुर | ११५ | २ | ० | १८.०० |
| १२३ | हमरापुर | ११५ | ३ | ० | ३७.०० |
| १२४ | कोपर | ५४ | - | ० | ०१.०० |
| १२५ | कोपर | ५३ | - | ० | ७९.०० |
| १२६ | कोपर | ५२ | - | १ | २६.०० |
| १२७ | कोपर | ५१ | - | ० | २९.०० |
| १२८ | कोपर | ५९ | - | ० | २८.०० |
| १२९ | कोपर | ५० | - | ० | ०१.०० |
| १३० | कोपर | ४९ | - | १ | ३२.०० |
| १३१ | कोपर | ४७ | - | ० | ४६.०० |
| १३२ | कोपर | ४६ | - | ० | ८९.०० |
| १३३ | कोपर | ३८ | - | ० | ४०.०० |
| १३४ | कोपर | ४५ | - | ० | ४४.०० |
| १३५ | कोपर | ४४ | - | ० | १९.०० |
| १३६ | कोपर | ३९ | - | ० | ०५.०० |
| १३७ | कोपर | ४० | - | ० | ५२.०० |
| १३८ | कोपर | ४१ | - | १ | ३०.०० |
| १३९ | कोपर | ४२ | - | ० | २५.०० |
| १४० | कोपर | १० | - | १ | ६३.०० |
| १४१ | कोपर | ९० | - | ० | ०१.०० |
| १४२ | कोपर | १२ | - | ० | ०२.०० |
| १४३ | कोपर | ११ | - | ० | ६५.०० |
